**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet :http/www.dte.org.in

क्र. २अ/एडीएम/ARC/२०१२/९३५८
दि.

०२ JUL 2012

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे /नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

**विषय : शै.वर्ष २०१२-१३ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबतचे AIEEE उमेदवारांकडून प्राप्त झालेले धनाकर्ष जमा करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शै. वर्ष २०१२-१३ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे Submission of Online Application Form, Document Verification & Confimation चे काम विविध प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रावर करण्यात आलेले आहे. त्याकरीता AIEEE उमेदवारांकडून प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रावर रु.५००/- व रु.७००/- एवढे शुल्क धनाकर्षाद्वारे स्विकारण्यात आले आहे.

याबाबतच्या आपल्या विभागातील संबंधित केंद्राना जमा झालेल्या धनाकर्षाची दोन्ही बाजूची Preparation Line फाडून धनाकर्ष रक्कमनिहाय व बँकनिहाय वेगवेगळे करण्यास कळविण्यात यावे. तसेच बँकनिहाय व रक्कमनिहाय वेगवेगळ्या केलेल्या धनाकर्षाची सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार यादी करण्यांत यावी. यादीतील क्रमांकाप्रमाणे धनाकर्ष लावून सदर धनाकर्ष आपल्या कार्यालयात दि. १० जूलै २०१२ पर्यंत रिपोर्टसहीत तसेच यादीच्या सॉफ्ट कॉपीसहीत सादर करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. सदर कामी खालील गोष्टी कटाक्षाने तपासण्यात याव्यात.

१. एप्रिल २०१२ नंतर बँकेने दिलेल्या निर्देशानुसार सर्व धनाकर्षाची मुदत तीन महिने असल्यामुळे मुदतबाह्य झालेले धनाकर्ष स्विकारण्यांत येऊ नयेत.
२. सदरचे धनाकर्ष हे मुंबई येथील शाखेवर (Payable at Mumbai) देय असणारे असावेत.
३. धनाकर्ष स्विकारताना The Director, Technical Education, Mumbai या नावाने असल्याची खात्री करुन धनाकर्ष स्विकारण्यात यावेत.
४. रु.५००/- व रु.७००/- पेक्षा कमी रकमेचे अथवा जास्त रकमेचे धनाकर्ष स्विकारण्यात येऊ नयेत.

वरील काम करताना धनाकर्ष मुदतबाह्य होणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत सर्व प्रवेश अर्ज स्विकृती केंद्राना सूचना देण्यात याव्यात. या कामी सहा. संचालक (अतां) यांची नियुक्ती करण्यात यावी व प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रानी आपल्याकडे जमा केलेले धनाकर्षांची खातरजमा करुन सहा. संचालक (अतां) यांनी संचालनालयास दि.२१ जूलै २०१२ पर्यंत जमा करावेत. या संदर्भात काही त्रुटी उद्‌भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय यांची राहील.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : सर्व प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र यांस माहिती व आवश्यकत्या कार्यवाहीकरिता
(विभागीय कार्यालयामार्फत)

पृष्ठांकन क्र० विकाऔ/शिक्षण/३८३१
दिनांक 18 JUL 2012

प्रत.
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद अखत्यारीतील सर्व प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र यांना माहितीस्तव व अनुपालनास्तव. तसेच त्यांना कळविण्यांत येते की, परिपत्रकातील सूचनांप्रमाणे सोबत जोडलेल्या प्रपत्रातील माहितीसह [सॉफ्टकॉपीसह] या कार्यालयास तात्काळ डिमांड ड्राफ्ट जमा करावेत.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद.

Directorate of Technical Education, Mumbai
List of DD received towards sale of Information Brochure Application Kits (Course name)

| Sr. No | Bank Name | MICR Code | DD/PO Number | Date | Amount of DD |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |
| 6 | | | | | |
| 7 | | | | | |
| 8 | | | | | |
| 9 | | | | | |
| 10 | | | | | |
| 11 | | | | | |
| 12 | | | | | |
| 13 | | | | | |
| 14 | | | | | |
| 15 | | | | | |

DD/PO should be in the name of 'The Director, Technical Education, Mumbai' Payable at 'Mumbai'
List Sorted by Bank Name